मु.शु. ₹ ५० १००/-

# स्थावरचे खुल्या जागेचे, २९ वर्ष मुदतीचे रजिस्टर्ड भाडे करार

| | | |
|---|---|---|
| मुदत | : | २९ वर्षे |
| क्षेत्रफळ जागा | : | ० हे. ४२ आर |
| मासिक भाडे | : | ₹ २,१००/- |
| जि. प. यवतमाळ | | मौजा तेलंगटाकळी |

| | | |
|---|---|---|
| लिहून घेणार (पार्टी नंबर १) | : | केळापूर कृषी विकास आदिवासी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड<br>करंजी (रोड), ता. केळापूर, जि. यवतमाळ.<br>तर्फे अध्यक्ष मंजुषा रामभाऊ गेडाम.<br>वय : ४३ वर्षे. व्यवसाय : शेती.<br>रा. धारणा, ता. केळापूर, जि. यवतमाळ |
| | | यांना |
| लिहून देणार (पार्टी नंबर २) | : | संजय नागोराव मुद्दावार.<br>वय : ४६ वर्षे. व्यवसाय : शेती.<br>रा. तेलंगटाकळी, ता. केळापूर, जि. यवतमाळ. |

सन २०२१ साल कारणे स्थावरचे खुल्या जागेचा २९ वर्ष मुदतीचा रजिस्टर्ड भाडे करारनामा लिहून देको की, माझ्या (पा. नं. २ यांच्या) मालकी व ताब्यातील

<u>मौजा तेलंगटाकळी</u>, ता. केळापूर, जि. यवतमाळ येथील

| गट नं. | हे. आर. | आ. रु. | भो. वर्ग |
|---|---|---|---|
| १०५ | ०.४२ | ०.४० | १ |

हे संपूर्ण शेत असून ते तुम्ही केळापूर कृषी विकास आदिवासी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड या कंपनीच्या शेतमाल प्रोसेसिंग युनीट व साठवण भंडार (गोदाम) करिता २९ वर्षाकरिता भाड्याने मागितले.

या स्थावरच्या चतु:सीमा : -

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | : | ग्राम पंचायतची जमीन |
| पश्चिमेस | : | बोमेनवार यांचे शेत |
| उत्तरेस | : | माने यांचे शेत |
| दक्षिणेस | : | वन विभागाची जमीन |

संजय मुद्दावार

क ल प

दस्त क्र 2002/2021

८/२२

वरील शेताची संपूर्ण खुली जागा सदर कंपनीच्या कामाकरिता दि. ०१-०१-२०२२ पासून ते दि. ३१-
२०५० पर्यंत या २९ वर्षे काळासाठी ₹ २,१००/- मासिक भाडे प्रमाणे भाडे तत्वावर देण्याचा करार करीत
हे. तुम्ही केवळ तुमच्या वरील कंपनीच्या कामाकरिता सदर स्थावरचा उपयोग व उपभोग घेणार आहात.

तुम्ही तुमच्या कामाकरिता सदर जागेत तुमच्या मर्जीनुसार आणि तुमच्या खर्चाने गोदामाचे तसेच
त्य प्रकारचे बांधकाम करून घ्यावे तसेच सदर जागेत विद्युत पुरवठा आणि पाण्याची सोय करून घ्यावी
सेच तुमच्या कामाकरिता आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या परवानग्या तुम्ही प्राप्त करून घ्याव्या.
दर सर्व कामांकरिता लागणारा संपूर्ण खर्च हा कंपनीने करावा त्याचा भाड्याच्या रकमेशी काहीही संबंध
हणार नाही. सदर कामासाठी माझ्या (पा. नं. २ यांच्या) संमती, सह्या, नाहरकतपत्र आवश्यक असल्यास
मी तुम्हास (पा. नं. १ यांना) देईन. वरील मुदतीपावेतो या स्थावर मध्ये मी कुठल्याही प्रकारे हस्तक्षेप
रणार नाही. सदर जागेत तुम्ही कोणताही बेकायदेशीर व्यवसाय करणार नाही.

सदर करार दि. ०१-०१-२०२२ ते दि. ३१-१२-२०५० या २९ वर्षांच्या कालावधीसाठीचा आहे. वरील
कालावधीचे भाडे मासिक स्वरूपाचे असून ते ₹ २,१००/- (दोन हजार शंभर रुपये) इतके ठरले आहे.
ड्याचा महिना इंग्रजी कॅलेंडर प्रमाणे चालणारा असून तो प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला सुरू होऊन
याच महिन्याच्या शेवटच्या तारखेला संपाणारा राहील. प्रत्येक वर्ष संपल्यानंतर तुम्ही ५ % वाढ करून ते
ाडे देण्याचे ठरले आहे. भाड्याचा महिना संपताच तुम्ही मला या स्थावरचे भाडे नियमीतपणे द्यावे. या
थावरकरिता डिपॉझीट म्हणून कोणतीही रक्कम देण्यात आलेली नाही.

२९ वर्षांची मुदत संपलयावर नवीन भाडे करारनामा आपल्या दोघांच्या संमतीने अस्तित्वात येईल
व तो भाडेकरार नोंदणीकृत करण्यात येईल अन्यथा २९ वर्षांची मुदत संपताच तुम्ही मला संपूर्ण स्थावर
परत देणार आहात.

मुदत संपल्यावरही तुम्ही सदर स्थावर परत न दिल्यास सदर जागेच्या ताब्याकरिता मी वि.
न्यायालयात तुमच्याविरूद्ध दावा दाखल करून या स्थावरचा ताबा परत घेण्यास अधिकारी राहील. त्या
परिस्थितीत वि. न्यायालयाचा सर्व खर्च, माझे होणारे नुकसान मागण्याचा मला पूर्ण अधिकार राहील.

मुदतीपूर्वी मला सदर स्थावरचा ताबा परत घ्यावयाचा असल्यास मी तुम्हास त्याबाबत तीन महिने
आधी पूर्वसूचना देईन. तसेच मुदतीपूर्वी सदर स्थावरचा ताबा तुम्हाला सोडून द्यावयाचा असल्यास तुम्ही
मला तीन महिने आधी पूर्वसूचना द्यावी.

वरील स्थावर मी तुम्हास केवळ वरील कंपनीच्या कामाकरिता भाडे तत्त्वावर दिली आहे. सदर
स्थावर तुम्ही कोणासही विक्री करू शकणार नाही किंवा त्याचे गहाणखत तसेच कोणताही सौदा किंवा
इसार तुम्ही करू शकणार नाही. सदरहू स्थावर मध्ये पोटभाडेकरू ठेवण्याचा किंवा कोणत्याही प्रकारे
दुसऱ्या व्यक्तीला कब्जा करू देण्याचा अधिकार तुम्हाला राहणार नाही.

नेनाजुद्दावार

... of the Sub Re...

दस्त क्र 2-02-/2022

122

सदरहू स्थावर मध्ये वापरल्या जाणाऱ्या विजेचे बील, पाण्याचे बील वगैरे भरण्याची जबाबदारी तुमचीच राहील. याशिवाय सरकारकडून तुमच्या कामासंबंधित कोणत्याही प्रकारचे कर घेतले जात असतील तर ते तुम्हीच भरणार आहात. मात्र सदर मालमत्तेचे माझ्या नावाने येणारे कर भरून देईन. मी लिहून देणार आदिवासी समाजाचा नाही.

सदरचा दस्त हा आम्हाला लिहून घेणार आणि लिहून देणार यांना खालील साक्षीदारांसमक्ष वाचून दाखविला असून तो आम्ही दिलेल्या माहितीनुसार बरोबर लिहिला आहे व तो आम्हाला मान्य असल्याने स्वखुशीने सादीत केला आहे.

येणेप्रमाणे हा भाडे करारनामा आम्ही वाचून घेऊन समजाऊन घेऊन पूर्ण प्रकारे बरोबर लिहिला याची खात्री करून त्यावर खालील साक्षीदारांसमक्ष आमच्या सह्या केल्या. सदर लेख आम्हास व आमचे वारसास लागू व बंधनकारक असे आज दि. २८/१२/२०२१

:गो.वा.नाईक, पांढरकवडा.

साक्षीदार



रामभाऊ वारलु गेडाम.
वय : ४७ वर्षे.
रा. धारणा,
ता. केळापूर,
जि. यवतमाळ.



सुरेंद्र विठ्ठलराव गड्डमवार.
वय : ३६ वर्षे.
रा. राणी लक्ष्मीबाई वॉर्ड,
पांढरकवडा,
ता. केळापूर,
जि. यवतमाळ.

लिहून घेणार



लिहून देणार



The Seal of the Sub-Registrar of
दुय्यम निबंधक केळापूर

क ळ प
दस्त क्र. २०१२/२०२१
पृ. १२२